— कु —



नि० ७६

आरोपीची संक्षिप्त संपरिक्षा भारतीय नागरीक सुरक्षा संहितेप्रमाणे
**संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक १९१/२०२४** चा अभिलेख
सी.एन.आर.क्र. एम.एच.एस.आय ०९-०००३९६-२०२४

**श्री. श्रीकांत एस. पचंडी, न्यायदंडाधिकारी वर्ग १, देवगड**

**निशाणी** ७६

| | | |
|---|---|---|
| १) अपराध घडल्याचा दिनांक | : | ०६/१०/२०२४ |
| २) अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | : | १९/१०/२०२४ |
| ३) फिर्यादीचे नाव, वय व पत्ता | : | समद अब्दुलसत्तार शेख<br>वय- ४३ वर्षे, धंदा- व्यवसाय<br>रा. मु.पो. जामसंडे-मळई,<br>ता.देवगड, जि. सिंधुदुर्ग |
| ४) आरोपीचे नाव, वय व पत्ता | : | वसिम युनूसखान पठाण<br>वय - ४५ वर्षे, धंदा- व्यवसाय<br>रा. साईमा बिल्डींग, देवगड सातपायरी<br>ता.देवगड, जि. सिंधुदुर्ग |

५) ज्या बद्दल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपीला समजावून सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशील :

तुम्ही फिर्यादी यांचेकडून घेतलेल्या कर्ज रक्कमेच्या परत फेडीसाठी तुम्ही फिर्यादीला दिलेला कोटक महिंद्रा बँक, शाखा रत्नागिरी यांचेकडील दि.१४/१०/२०२४ रोजीचा धनादेश क्र.००००८१ रक्कम रुपये १,००,०००/- चा धनादेश दिला. सदरचा धनादेश फिर्यादीने त्यांचे खाते असलेल्या युको बँक शाखा देवगड येथे जमा केला असता संबंधित बँकेने वरील नमुद धनादेश तुमच्या खात्यात पुरेशी रक्कम नसल्यामुळे Fund Insufficient न वटविता दि.१७/१०/२०२४ रोजी परत केला आणि फिर्यादीने दि.२९/१०/२०२४ रोजी धनादेशाची रक्कम मागणीसाठी तुम्हाला पाठविलेली कायदेशिर नोटीस तुम्हाला दि.०२/११/२०२४ रोजी मिळून देखील तुम्ही १५ दिवसात धनादेशाची रक्कम दिली नाही आणि म्हणून तुम्ही चलनक्षम दस्तऐवज कायद्याचे कलम १३८ अन्वये शिक्षापात्र अपराध केला.

६) आरोपीचे प्रतिकथन :

प्रश्न क्र. १ : तुम्हाला फिर्यादी पक्षाच्या कागदपत्रांच्या नकला मिळाल्यात काय ?

उत्तर : होय

प्रश्न क्र.२ : तुमच्यावर असलेला दोषारोप आता वाचून दाखविला तो तुम्हाला समजला काय ?

उत्तर : होय

प्रश्न क्र.३ : तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तर : नाही, मला गुन्हा कबूल नाही.

दिनांक :१९/११/२०२५

(आरोपीची सही )

समक्ष

(श्रीकांत एस. पचंडी)
न्यायदंडाधिकारी वर्ग १, देवगड

दिनांक : १९/११/२०२५